RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ७३] गुरुवार, जून ६, २०१९/ज्येष्ठ १६, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर–२०१९/प्र.क्र.८/कराधान.३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री आली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, ११७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही ;

म्हणून, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर (सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर नियम, १९७५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल) च्या नियम ११ मध्ये, उप नियम (३) मध्ये,

(एक) खंड (अ) मध्ये, " रुपये ५०, ००० पेक्षा कमी होता " या शब्द आणि अंका ऐवजी " रुपये १,००,००० पेक्षा कमी होता " हे शब्द आणि अंक दाखल करण्यात येत आहेत ;

( दोन) खंड ( क) मध्ये " रुपये ५०, ००० किंवा जास्त आहे " या शब्द आणि अंका ऐवजी " रुपये १,००,००० किंवा जास्त आहे " हे शब्द आणि अंक दाखल करण्यात येत आहेत.

३. मुख्य नियमांच्या नियम २८ मध्ये, उप नियम (१) मध्ये,—

(एक) परंतुकामध्ये, " प्रभावी असल्याचे मानण्यात येईल " या शब्दां ऐवजी " प्रभावी असल्याचे मानण्यात येईल ; किंवा " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(दोन) परंतुकानंतर खालील खंड दाखल करण्यात येत आहे म्हणजेच :-

" (तीन) नोटीशीची प्रत स्कॅन करून किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून तयार केलेली आणि डिजीटल स्वाक्षरी केलेली प्रत ई-मेल ने पाठविणे." .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th June 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PFT-2019/C.R.8/Taxation-3.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication under the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely:—

1. These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Rules, 2019.

2. In rule 11 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 (hereinafter referred to as " the principal Rules"), in sub-rule (*3*),–

   (*i*) in clause (*a*), for the words and figures " was less than Rs. 50,000" the words and figures " was less than Rs. 1,00,000" shall be substituted;

   (*ii*) in clause (*c*), for the words and figures "was Rs. 50,000 or more" the words and figures "was Rs. 1,00,000 or more" shall be substituted.

3. In rule 28 of the principal Rules, in sub-rule (*1*),–

   (*i*) in the proviso, for the words "addressee personally", the words "addressee personally ; or" shall be substituted ;

   (*ii*) after the proviso, the following clause shall be added, namely :–

   "(*iii*) by sending a scanned copy or electronically generated and digitally signed copy of the notice by e-mail.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.